E-4416775

पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण यांचे कार्यालय
जिल्हाधिकारी कार्यालय कंपाउन्ड,सोलापुर -४१३००३
दुरध्वनी :- ०२१७-२७३२०१०
फॅक्स:- ०२१७-२७३२००८
ई-मेल:- sp.solapur.r@mahapolice.gov.in

जा.क्र.पशा-२/ एसी मशिनचे देखभाल दुरूस्ती करार/२०२६ सोलापुर ग्रामीण- /०५/२०२६

14 MAY 2026

**संदर्भ-:** पोलीस निरीक्षक पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान कार्यालय, सोलापूर ग्रामीण ,यांचेकडील जा.क्र.सी-७/१४६/२०२६ ,दि.०३/०२/२०२६.

**विषय-:** एसी मशिनचे देखभाल दुरूस्ती करार निविदा (दरपत्रके) सादर करणेबाबत..

**आदेश:-**

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आदेशीत करण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आस्थापनेवरील मा.पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक,कार्यालयातील विविध शाखा पोलीस मुख्यालय व्हीआयपी विश्रामगृह सायबर शाखा इत्यादी ठिकाणी असलेले एकूण २४ एसी मशिनचे देखभाल दुरूस्ती करिता किती खर्च येतो याबाबतचा दर करार करणेकरिता स्थानिक बाजारातील दरपत्रके सादर करणेकरिता महाराष्ट्र शासन निर्णय उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निणर्य भाखसं/२०१४/प्र.क्र-८२/भाग-३/उदयोग-४,दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मधील ४.४.३ मधील नियामानुसार खाजगी /अधिकृत विक्रेते यांचेकडून दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशिल | एसी संख्या | प्रति नग दर |
|---|---|---|---|
| 1 | **ए.सी.दुरूस्ती सर्व स्पेअर पार्ट सह एक** | २४ | |
| 2 | **वर्षासाठी देखभाल व दुरूस्त करणे(कॉम्प्रेसर सोडून)** | | |

**अटी व शर्ती-:**

१. निविदकार कंपनीचे पूर्ण नांव व पत्ता दुरध्वनी सह
२. निविदाकार कंपनीचे मालकांचे /भागीदाराचे /संचालककांचे पूर्ण नांव व पत्ते दुरध्वनीसह
३. निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (Copany Incorporation/Shop Act)
४. निविदाकार कंपनीचे मालकाचे पॅन कार्ड/टॅन कार्ड
५. एसी मशीनचे देखभाल व दुरूस्ती काम शासकीय व निमशासकीय संस्थेमध्ये केलेबबातचे पुरवठा आदेश जोडणे बंधनकारक
६. आपण दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कपंनीचे उपकरण अथवा साहित्याचा उपयोग करावायाचा आहे.
७. आपण वरील ठिकाणी इलेक्ट्रीकल उपकरणे अथवा साहित्य फिटींग करीत असताना अथवा साहित्य दुरुस्त करीत असताना आपणास काहीही झाले तर (म्हणेजच उदा. आपण वरुन खाली पडला, आपणास विदयुत वाहकातून आलेला करंट (शॉक) बसला, इत्यादी ) कारणामुळे आपल्या जिवास काहीही झालेतर हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदार आपली राहिल.
८. एसी मशीनचे देखभाल व दुरूस्ती करारचे देयक मासिक पध्दतीने देण्यात येईल.

९. प्राप्त होणा-या देयका मधून नियमाप्रमाणे टी.डी.एस.आयकर कपात करण्यात येईल.

१०. विहित मुदतीत /वेळेत काम न केल्यास व तक्रार प्राप्त झाल्यास अथवा असमाधानकारक काम केल्यास आवश्यक ती कारवाई करण्याचे हक्क पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांचेकडे राहतील.

११. आपण निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे साहित्य **ISI Standard Quality** चे असले पाहिजे. साहित्य खराब झाल्यास नवीन साहित्य बसविणे आवश्यक आहे.

१२. करावयाच्या कामा बाबतच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्या बाबत चे रक्कम रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहिल.

१३. पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण हे कायदा सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे तसेच वर्षाचे **३६५** दिवस व **२४** तास जनतेची सेवा करीत असल्यामुळे निविदाकार कपंनीस सुध्दा आपली सेवा **३६५** व **२४** तास या पध्दतीने द्यावी लागेल. कार्यालयीन वेळ व कार्यालयीन कामकाजाचे तास या पध्दतीने सेवा देता येणार नाही.

१४. मंजूर निविदाकार कंपनीस स्वत:लाच संबधित काम करावे लागेल. निविदाकारास कोणतीही दुसरी कंपनी Sub Contract देता येणार नाही. त्रयस्थ व्यक्तीस (Thirty Party) सुध्दा सदरचे काम करण्यास नियुक्त करता येणार नाही. असे आढळून आल्यास करार तात्काळ रदद केला जाईल. व निविदाकारास काळया यादीमध्ये टाकण्यात येईल.

१५. एसी नादुरूस्त झाल्यास तात्काळ येऊन दुरूस्त करावा लागेल. तसेच त्याकरिता लागणारे सर्व साहित्य (कॉम्प्रेसर सोडून) आपण स्वत:खरेदी करून ए.सी.दुरूस्त करावयाची आहे.

१६. दर तीन महिन्यातून तपासणी केलेनंतर त्याचे देयक सादर करण्यात यावे.

१७. वेळेवर एसी दुरूस्त केले नाहीत टाळाटाळ केली तर करार रदद करण्यात येईल.

१८. समन्वय अधिकारी पोलीस निरीक्षक,पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, सोलापूर ग्रामीण याचे मार्फतीने सादर करणे आवश्यक आहे . प्रत्येक ए.सी.मशिनचे स्वतंत्र अख्यायिका (History Sheet) ठेवणे आवश्यक आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आस्थापनेवरील मा.पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक,कार्यालयातील विविध शाखा पोलीस मुख्यालय व्हीआयपी विश्रामगृह सायबर शाखा इत्यादी ठिकाणी असलेले एकूण २४ एसी मशिनचे देखभाल दुरूस्ती करिता करणेबाबचे दर पत्रक (निविदा) या कार्यालयाच्या **www.solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेनंतर **दिनांक.२०/०५/२०२६ रोजी ठिक .६.०० वाजेपर्यत** पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग सोलापूर ग्रामीण येथे सादर कराव्यात विहित मुदती नंतर प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

**पोलीस अधीक्षक,**
**यांचे मान्यतेने.**

**( शिरीष हुंबे )**
**पोलीस उपअधिक्षक (मुख्या),**
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण.**
**यांचेकरिता.**

**प्रति, पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण.**

२/- सदर पोलीस अधीक्षक कार्यालयाचे आस्थापनेवरील मा.पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक,कार्यालयातील विविध शाखा पोलीस मुख्यालय व्हीआयपी विश्रामगृह सायबर शाखा इत्यादी ठिकाणी असलेले एकूण २४ एसी

मशिनचे देखभाल दुरूस्ती करिता करणेबाबचे दरपत्रके मागविणे बाबतची जाहिरात या सोबतच्या विवरण पत्रासोबत कार्यालयाच्या **www.solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**प्रत-पोलीस निरीक्षक पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान कार्यालय,सोलापूर ग्रामीण**

२/- वरील एसी मशिनचे देखभाल दुरूस्ती करणेबाबतचे सीलबंद निविदा प्राप्त झालेनंतर आपलेकडील अहवालासाह या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात याव्यात.